## 'तापी'ची मदत : ६९२ मीटरचे भुयार खोदले केवळ १६० दिवसांत

# तानसा जलवाहिनीखालील मेट्रोचे भुयार पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मेट्रो-३चे काम वेगात सुरू आहे. मुंबईच्या पोटातून धावणाऱ्या या मेट्रोसाठी भुयार तयार करण्यात येत आहे. यातील सर्वांत आव्हानात्मक काम होते ते तानसा जलवाहिनीला सुरक्षित ठेवून त्याखालून मेट्रो स्थानकाच्या बांधणीचे काम करणे. मात्र मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने कौशल्याने हे आव्हान पार पाडले. विशेष म्हणजे 'तापी' या टीबीएम मशीनच्या साहाय्याने पॅकेज ६ मधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ ते सहार रोड दरम्यान ६९२ मीटरचे भुयार केवळ १६० दिवसांत पूर्ण केले आहे.

१५० तज्ज्ञ अभियंते आणि कामगारांच्या अथक परिश्रमाने हे भुयार यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. तापी १ या टीबीएम मशीनद्वारे १३ सप्टेंबर, २०१८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापासून ते सहार रोडपर्यंतच्या भुयारीकरणाला प्रारंभ करण्यात आला होता.

ब्रेशिया आणि बेसाल्ट यांसारख्या टणक खडकांना भेदत तापी १ ने ४९५ आरसीसी सिमेंट रिंग्सचा वापर करीत भुयार तयार केले. ८९ मीटर इतके लांब तापी १ या टेराटेक कंपनीच्या टीबीएमद्वारे प्रतिदिन ४. ३१ मीटर इतक्या वेगाने तापी १ ही मशीन भुयारीकरण करते.



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या संपूर्ण प्रकल्पातील ५२ किमी भुयारीकरणापैकी २० किमीपेक्षा जास्त भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

### अभियंत्यांना श्रेय

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले की, मुंबई मेट्रो ३ च्या संपूर्ण प्रकल्पात सहार मेट्रो स्थानकाची बांधणी सर्वांत महत्त्वपूर्ण आणि तितकीच आव्हानात्मक आहे. हे आव्हान आमच्या अभियंत्यांनी यशस्वीपणे पार पाडले आहे. कारण मुंबईची सर्वांत महत्त्वाची जलवाहिनी 'तानसा'ला संपूर्णपणे सुरक्षित ठेवून त्याखालून सहार मेट्रो स्थानकाच्या बांधणीचे काम पूर्ण करण्यात त्यांना यश आले आहे.